मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 8 नोव्हेंबर 2025 | पान- 1

# बोगस मतदान रोखण्यासाठी महापालिका सज्ज

## दुबार मतदारांना दोन स्टारची खूण; पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक तयारी वेगात

**पिंपरी | प्रतिनीधी**

दोन किंवा जास्त ठिकाणी मतदान यादीत नोंद असलेल्या मतदारांना एकाच ठिकाणी मतदान करता येईल. मतदारांच्या यादीतील नावापुढे दोन स्टार चिन्हांकित केले जाणार आहे. त्या मतदारांकडून आधीच ते कोणत्या ठिकाणी मतदान करणार आहेत, याबाबत लेखी हमीपत्र घेतले जाईल. जरी दोन ठिकाणी नाव असले तरी त्या मतदाराला एकाच ठिकाणी मतदान करता येईल. बोगस (दुबार) मतदान होऊ नये, यासाठी महापालिका प्रशासनाकडून वेगवेगळ्या पातळीवर खबरदारी घेण्यात येत आहे, असे असे महापालिकेच्या निवडणूक विभागाकडून सांगण्यात आले आहे.




मतदार यादीमधील घोळ आणि दुबार मतदारांच्या मुद्द्यावरून संपूर्ण राज्यात विरोधकांनी रान उठवले आहे. तसेच, मतदार यादीतील दुरुस्ती होईपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याची मागणी महाविकास आघाडीसह महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केली आहे. शहरातील पिंपरी, चिंचवड व भोसरी विधानसभा मतदारसंघातही मोठ्या संख्येने दुबार मतदार आहेत, अशी तक्रार राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) माजी शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केली आहे.

**हमीपत्र घेतले जाणार**

मतदार यादीत दोन किंवा जास्त ठिकाणी नोंद असलेल्या मतदाराच्या यादीतील नावापुढे दोन स्टार चिन्हांकित केले जाणार आहे. या मतदाराकडून आधीच तो कोणत्या ठिकाणी मतदान करणार, हे लिहून घेतले जाईल. दोन ठिकाणी नाव असले तरी तो एकाच ठिकाणी मतदान करेल. ज्याने आधी लिहून दिले नसेल आणि तो मतदार एखाद्या केंद्रात मतदानाला गेल्यास तिथे त्याच्याकडून हमीपत्र लिहून घेतले जाईल. त्यानंतरच त्याला तेथे मतदान करू दिले जाईल, असे निवडणूक विभागाने सांगितले.

एक जुलै 2025 ची मतदार यादी निवडणुकीसाठी ग्राह्य धरण्यात आली आहे. त्यामुळे आता त्या यादीमध्ये एकही नाव कमी करणे किंवा जोडणे शक्य नाही. तसेच, त्या यादीमध्ये काही नावे दुबार असल्याची शक्यता आहे. अशी दुबार नावे शोधली जात आहेत. महापालिका निवडणुकीसाठी प्रभागनिहाय मतदार यादी तयार करण्यासाठी कर्मचारी काम करीत आहेत. त्यांना दुबार मतदार आढळून आल्यास तसे सांगण्यात आले आहे. त्या नावाची नोंद तशी केली जाणार आहे. दुबार नावे असलेल्या मतदारांना एकपेक्षा जास्त ठिकाणी मतदान करता येऊ नये, यासाठी त्यांच्या नावापुढे दोन स्टार दिले जाणार आहेत. त्यासाठी निवडणूक आयोगाकडून देण्यात येणाऱ्या स्वतंत्र प्रणालीत विशेष नोंद केली जाणार आहे. प्रत्यक्ष मतदान होईपर्यंत दुबार मतदारांची नावे शोधण्याची मोहीम सुरूच राहणार आहे. त्यासाठी स्वतंत्र कर्मचारी नेमण्यात आले आहेत.

### 22 नोव्हेंबरपर्यंत हरकती स्वीकारणार

» प्रारूप मतदार यादी मंगळवारी (दि. 14) प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यावर 22 नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना मागविण्यात येणार आहे. प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी घेऊ? अंतिम मतदार यादी 6 डिसेंबरला प्रसिद्ध केली जाईल. तसेच, मतदान केंद्रनिहाय मतदार यादी 12 डिसेंबरला प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

# वाघुसाने चौक ते अष्टविनायक चौक रस्त्याची दुर्दशा

## रस्त्यावरील मोठ-मोठ खड्डे चुकवताना दुचाकीस्वाराचा तोल जाऊन किरकोळ अपघात

**पिंपरी | प्रतिनीधी**

वाघुसाने चौकपासून पुढे अष्टविनायक चौकापर्यंत रस्त्यांची चाळण झाली आहे. रस्त्यावरील मोठ-मोठ खड्डे चुकवताना दुचाकीस्वाराचा तोल जाऊन किरकोळ अपघात होत आहेत. हा रस्ता महापालिका प्रशासनाने लवकरात-लवकर दुरुस्त करावा अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.




पावसामुळे साने चौकातील अंतर्गत रस्ते, वाघुसाने चौक ते अष्टविनायक चौकातील रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. अनेक दिवसांच्या पाठपुराव्यानंतर चिंचेचा मळा रस्त्याचे काम मार्गी लागले. मात्र अंतर्गत रस्त्यांची दुर्दशा तशीच आहे. वाघू साने चौकापासून अष्टविनायक चौकापर्यंत रस्त्यावरील जीवघेणे खड्डे भरून डांबरीकरण करावे अशी मागणी केली जात आहे.

> महापालिका प्रशासनाकडे रस्त्यांच्या दुर्दशेबाबत सातत्याने पाठपुरावा करावा लागतो. पाठपुरावा केल्यानंतर लगेच यश येत नाही. साने चौकातील अनेक अंतर्गत रस्त्यांची दुर्दशा आहे. वाघू साने चौक ते अष्टविनायक चौकात दुचाकी, चारचाकी चालवताना गाडी खिळखिळा होते. नागरिकांना पण हाडांचे दुखणे सहन करावे लागते. त्यामुळे अधिकाऱ्यांनी लवकरात-लवकर रस्त्याचे काम मार्गी लावून नागरिकांना, वाहनचालकांना दिलासा द्यावा.
>
> **- यश साने, युवा नेते.**

> परिसरात चिंचेचा मळा रस्त्याचे काम काही दिवसांपूर्वी मार्गी लावले आहे. तसेच मोरे वस्ती व इतर रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम सुरु आहे. चार दिवसांत वाघुसाने चौक ते अष्टविनायक चौकातील खड्डे बुजविण्याचे काम होईल. डांबरीकरणाचे काम प्लांट सुरु झाल्यास होणार.
>
> **- संजय जाधव, उपअभियंता स्थापत्य विभाग.**

> नागरिकांना दुचाकीवरून ये-जा करताना खड्डयांमुळे जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. मुलांना शाळेत सोडायला जाताना महिलांनाही खड्डे चुकवून गाडी चालवताना मोठी कसरत करावी लागते. अनेकदा किरकोळ अपघात झाले आहेत. त्यामुळे महापालिका प्रशासनाने तत्काळ खड्डे बुजवून डांबरीकरण करावे.
>
> **- रूपाली साने, नवदुर्गा सखी मंच अध्यक्षा.**

# ऑनलाइन कर भरण्यास प्राधान्य

## 3 लाख 93 हजार मालमत्ताधारकांनी घेतला ऑनलाईन सुविधेचा फायदा




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने राबविलेल्या विविध जनजागृती उपक्रमांमुळे आणि सुलभ ऑनलाईन प्रणालीमुळे नागरिक आता मोठ्या प्रमाणात ऑनलाईन माध्यमातून मालमत्ता कर भरण्याकडे वळले आहेत. चालू आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२५ ते ६ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत शहरातील ७ लाख ४० हजार मालमत्ताधारकांपैकी ४ लाख ७७ हजार २८४ मालमत्ताधारकांनी कर भरला असून, त्यापैकी ३ लाख ९३ हजार ७७१ मालमत्ताधारकांनी ऑनलाईन माध्यमातून कर भरला आहे.

गेल्या काही वर्षांपासून महापालिकेने कर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. 'ऑनलाईन कर भरा' या मोहिमेखाली नागरिकांना प्रोत्साहित करण्यात आले. यामध्ये विशेष सवलतींची घोषणा, एसएमएस, सोशल मीडिया, स्थानिक चौकांवर सार्वजनिक घोषणांद्वारे जनजागृती करण्यात आली. या उपक्रमांचा परिणाम म्हणून नागरिकांनी प्रत्यक्ष कर कार्यालयात जाण्यापेक्षा ऑनलाईन माध्यमाचा मोठ्या प्रमाणात वापर केला.

महापालिकेने मालमत्ता कर भरण्यासाठी अधिकृत वेबसाइट उपलब्ध करून दिली आहे. या माध्यमातून नागरिकांना त्यांच्या मालमत्तेची माहिती, थकबाकी रक्कम, पावती डाउनलोड तसेच सवलतींचा तपशील एकाच ठिकाणी पाहता येतो. सुरक्षित पेमेंट आणि सुलभ वापरामुळे नागरिकांचा या डिजिटल माध्यमावर विश्वास वाढला आहे.

### ६३१ कोटी ६६ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल

पिंपरी चिंचवड महापालिकेने आर्थिक वर्ष २०२५-२६ या कालावधीत १ एप्रिल २०२५ ते ६ नोव्हेंबर २०२५ या काळात ६३१ कोटी ६६ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. यामध्ये ऑनलाईन माध्यमातून जमा झालेल्या कराची रक्कम तब्बल ५१५ कोटी रुपये आहे.

### ऑनलाइनचे फायदे

- करसंकलन कार्यालयांत रांगेत उभे राहण्यासाठीचा वेळ वाचतो
- महापालिकेच्या संकेतस्थळावर मिळकतकर भरण्याची सुविधा
- मालमत्तेची माहिती, थकबाकी रक्कम, पावती डाऊनलोड सुविधा
- सुरक्षित पेमेंट आणि सुलभ वापरामुळे डिजिटलवर विश्वास

### दृष्टिक्षेपात रक्कम (कोटी रुपयांत)

- मालमत्ता कर वसूल - ६३१.६६ कोटी
- ऑनलाईन – ५१५ कोटी
- रोख – ४३ कोटी २० लाख
- धनादेश – ३८ कोटी ६६ लाख
- डिमांड ड्राफ्ट – १ कोटी ८९ लाख
- ईडीसी – ६ लाख

"पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक डिजिटल साधनांचा उत्तम वापर करत आहेत. ऑनलाईन पेमेंट प्रणालीमुळे पारदर्शकता वाढली आहे आणि कर संकलन प्रक्रियेत वेग आला आहे. येत्या काळात अधिक सुविधा समाविष्ट करून ही प्रणाली अजून सुलभ करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**- पंकज पाटील, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# वाहतूक समस्येवर दीर्घकालीन नियोजन आराखडा तयार करा

## मंत्री चंद्रकांत पाटील; वाहतूक व पायाभूत सुविधांबाबतची महापालिकेत घेतली आढावा बैठक



**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या व वाढती वाहनसंख्या विचारात घेऊन भविष्यात शहरामध्ये वाहतूक कोंडीसारख्या समस्या निर्माण होऊ नयेत, यासाठी आगामी १५ वर्षांचा विचार करून महापालिकेने नियोजन आराखडा तयार करावा, असे निर्देश राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध विभागांची आढावा बैठक आज महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उमा खापरे, माजी आमदार अश्विनी जगताप, माजी महापौर राहूल जाधव, नितीन काळजे, माजी नगरसदस्य नामदेव ढाके, शत्रुघ्न काटे, विकास डोळस, ॲड.मोरेश्वर शेडगे, निगडी नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य वित्त व लेखा अधिकारी प्रविण जैन, शहर अभियंता मकरंद निकम, नगर रचना व विकास विभागाचे उपसंचालक किशोर गोखले, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंते मनोज शेठीया, अनिल भालसाखळे, सहा आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे, उपायुक्त अण्णा बोदडे, डॉ. प्रदीप ठेंगल, पंकज पाटील, ममता शिंदे, राजेश आगळे, संदीप खोत, सिताराम बहुरे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, उमेश ढाकणे, अतुल पाटील, अमित पंडित, अजिंक्य येळे, क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे, किशोर ननावरे, निवेदिता घार्गे, पूजा दूधनाळे, अश्विनी गायकवाड, राजाराम सरगर, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरातील घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, वाहतूक व्यवस्था, नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, आरोग्य व्यवस्था, वैद्यकीय व्यवस्था आदी सोयीसुविधांबाबत करण्यात येत असलेल्या कामाचा आढावा बैठकीमध्ये मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतला.

चंद्रकांत पाटील म्हणाले, शहरातील कचरा, सांडपाणी, वाहतूक असे प्रश्न सोडवण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांना गती देण्यात यावी. रस्त्यांवरील खड्डयांच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात यावे. सांडपाण्यावर प्रक्रिया करून पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर द्यावा. फुटपाथ अतिक्रमणमुक्त राहतील, यासाठी सुयोग्य नियोजन करावे, अशा सूचनाही मंत्री पाटील यांनी दिल्या. पिंपरी चिंचवड शहरामध्ये वाढणारी वाहनसंख्या लक्षात घेऊन वाहतूक कोंडीसारख्या समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. भविष्यात ही समस्या गंभीर होऊ नये, यासाठी पुढील १५ ते २० वर्षांचा विचार करून वाहतूक नियोजन आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे. तसेच तात्काळ उपाययोजनांसाठी पोलीस विभागाशी समन्वय साधून सिग्नल दुरुस्तींसह वाहतूक नियोजनासाठी इतर उपाययोजना करण्यास प्राधान्य द्यावे, असेही चंद्रकांत पाटील म्हणाले.

# मनासारख्या मतदार याद्यांसाठी धावाधाव

## जिंकून देणाऱ्या हक्काच्या वोट बँक आपल्याच प्रभागात राखण्यासाठी महापालिका प्रशासनाकडे लावली जात आहे 'सेटिंग'

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिका निवडणुकीसाठी प्रारुप प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर विरोधी पक्षाने संताप व्यक्त केला होता. आता पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय मतदारयाद्या तयार करण्याचे काम सुरू आहे. यामध्ये शहरातील काही अनुभवी माजी नगरसेवकांकडून आपल्याला मानणाऱ्या मतदारांची नावे प्रभागात राखण्यासाठी आहे. काही कर्मचाऱ्यांना हातीशी धरले जात असून मतदारांची नावे सोयीनुसार लावून घेतली जात असल्याची चर्चा महापालिकेत रंगली आहे. परंतु असा प्रकार घडला नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

प्रभाग रचना ही केवळ भाजपच्या भल्यासाठी केल्याचा आरोप करण्यात आला. यानंतर काही प्रमाणात बदल करुन प्रभाग रचना अंतिम करण्यात आली. परंतु त्यातही भाजपचाच फायदा असल्याचा आरोप केला जातो. प्रभाग रचना मनाप्रमाणे झाली नाही. पण किमान मतदार तरी हक्काचे असावेत, तसेच प्रभाग मनासारखा झाला आहे, पण विरोधात जाणाऱ्या मतदारांची धास्ती घेत त्यांनाच प्रभागाबाहेर काढण्याचा केला जात असल्याची माहिती समोर आली आहे.

प्रभागरचना मनासारखी झाली नाही तरी मतदारयादी स्वतःच्या मनासारखी करून घेण्यासाठी माजी नगरसेवक, इच्छुक उमेदवारांचा खटाटोप सुरू आहे. यासाठी क्षेत्रीय कार्यालय स्तरावरील मुकादम, सहाय्यक आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक यांसह अन्य कर्मचाऱ्यांची मदत घेऊन प्रभागातील धोकादायक मतदार बाहेर काढणे आणि सोईच्या मतदारांची नावे प्रभागात समाविष्ट करण्याचे उद्योग सुरू आहेत. कात्रजधनकवडी, बाणेर, बालेवाडी, कोंढवा, मंगळवार पेठ, कसबा पेठ, रविवार पेठे, चंदननगर, वडगाव शेरी, येरवडा या भागात असे प्रकार करण्याचा प्रयत्न केला आहे. दक्षिण पुण्यातील काही प्रभागांमध्ये भोर, वेल्हा, मुळशी या भागातील मतदारांचा समावेश करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये निवडणुकीच्या निकाल बदलेल अशा पद्धतीने मतदारांच्या याद्यांची अदलाबदल करण्यात येत आहेत. काही भागांत हा प्रकार घडल्यानंतर माजी नगरसेवकांनी अधिकाऱ्यांकडे जाऊन तक्रारीही केल्याचे प्रकार घडले आहेत.

दरम्यान, २०११ जनगणनेनुसार प्रभाग रचना केल्याने प्रभागातील लोकसंख्या ही लाखाच्या आत आहे; पण मतदारयाद्या या जुलै २०२५ पर्यंतची आहे. त्यामुळे बहुतांश सर्वच प्रभागांतील मतदारांची संख्या ही लाखाच्या वर गेली आहे. काही प्रभागांची संख्या तर पावणेदोन लाखाच्या वर गेली आहे. मतदारांची पळवापळवी सुरू केली आहे.




### यादी अंतिम होण्यापूर्वीच मतदारांची पळवापळवी करण्याचे धोरण

» प्रभागातील मतदार याद्यांवर पुणे महापालिका प्रशासनाचे काम सुरु आहे. जुलै २०२५ पर्यंतच्या याद्यांवर काम करणे सुरु असून ते अंतिम टप्प्यात आले आहे. मतदार याद्या क्षेत्रीय कार्यालयानुसार वाटून देण्यात आलेल्या आहेत. यादीवर पेन्सील तसेच पेनाने खुणा करण्यात आलेल्या आहेत. यावरुन प्रभागानुसार मतदार यादी तयार केली जात आहे. ही यादी अंतिम होण्यापूर्वीच मतदारांची पळापळवी करण्याचे धोरण काही माजी नगरसेवकांनी राबविले जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता प्रशासनाकडून काळजी घेतली जाऊ लागली आहे.

### १५ क्षेत्रीय कार्यालयांत मतदारयाद्यांवर काम

» राज्य निवडणूक आयोगाने प्रभागनिहाय मतदारयाद्यांची फोड करण्यासाठी कार्यक्रम जाहीर केला. पुणे महापालिकेला १४ ऑक्टोबर रोजी मतदारयादी सुपूर्त केली. या मतदारयादीची प्रभागनिहाय फोड करून प्रारूप मतदारयादी जाहीर करण्यासाठी १४ नोव्हेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली होती. गेल्या २० दिवसांपासून १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या स्तरावर मतदारयाद्या तयार करण्याचे काम सुरू आहे. या बाबत निवडणुक विभागाला माहिती विचारली असता, असे कोणताही प्रकार होत नसल्याचे सांगितले. तसेच मतदार याद्यांवर सुरु असलेले लॉगिन आणि आयडी काढून घेण्यात आले आहे. असा प्रकार घडणार नाही, यासाठी काळजी घेतली जाईल, असेही स्पष्ट केले आहे.

# सणस मैदानावर बाल खेळाडूंना बंदी; दहा वर्षाखालील मुलांमुळे ट्रॅक खराब होण्याचे दिले कारण

## महापालिकेच्या क्रीडा विभागाने मात्र, सणस मैदानावर 10 वर्षाखालील बाल खेळाडूंना सराव करण्यास बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.


**पुणे | प्रतिनिधी**

एकीकडे देशभरात उदयोन्मुख खेळांडूंना प्रोत्साहन देण्यासाठी क्रीडा महोत्सवांचे आयोजन केले जात आहे. असे असताना दुसरीकडे महापालिकेच्या क्रीडा विभागाने मात्र, सणस मैदानावर १० वर्षांखालील बाल खेळाडूंना सराव करण्यास बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिकेच्या या निर्णयाचा शिवसेना ठाकरे गटाने कडाडून निषेध केला आहे.

खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या 'खासदार चषक २०२५' स्पर्धेत ८ वर्षांखालील मुलांना सहभाग घेण्याची परवानगी आहे. मात्र, सामान्य पुणेकरांच्या १० वर्षांखालील मुलांना मैदानात प्रवेश नाकारला जात आहे. "हा कोणत्या प्रकारचा न्याय आहे?" असा सवाल शिवसेनेचे (ठाकरे गट) शहर प्रसिध्दी प्रमुख अनंत घरत यांनी केला. पालिकेने हा निर्णय मागे घेतला नाही, तर या विरोधात शिवसेना रस्त्यावर उतरेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

घरत म्हणाले की, एका बाजूला बाल क्रीडेला चालना देण्यासाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. एकीकडे या आयोजनांच्या उद्घाटनाचे नाट्य सुरू असते, तर दुसऱ्या बाजूला त्याच बालकांना मैदानाबाहेर ठेवण्यासारखे अन्यायकारक निर्णय घेतले जातात. ही क्रीडा विभागाची दुटप्पी भूमिका शिवसेना कधीही सहन करणार नाही.

सणस मैदान हे काही निवडक लोकांसाठी राखून ठेवलेले नाही. तर, हे मैदान सर्वसामान्य पुणेकरांसाठी असल्याचे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले, क्रीडा विभागाचा हा दुटप्पीपणा शिवसेना कधीही सहन करणार नाही. शिवसेनेने यापूर्वी २७ जून २०२५ रोजी क्रीडा विभागाला निवेदन दिले होते. परंतु, प्रशासनाने त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. सणस मैदान काही निवडक लोकांसाठी राखीव नाही; ते सामान्य पुणेकरांचे आहे.



### पालिकेचा अजब दावा

» पालिकेने गेल्या सहा महिन्यांपासून १० वर्षांखालील मुलांना मैदानावर बंदी घालून क्रीडाक्षेत्रातील सर्वात मोठा विनोद केला आहे. 'लहान मुलांमुळे ट्रॅक खराब होतो' असे कारण देणे म्हणजे स्वतःच्या निष्क्रियतेवर पांघरूण घालण्याचा प्रकार आहे. ही भूमिका बाल क्रीडेलाच नाही, तर क्रीडा संस्कृतीलाच अपमानित करणारी आहे, असे घरत यांनी म्हटले आहे. खासदार सुरेश कलमाडी यांच्या काळातील ट्रॅक १५-१७ वर्षे टिकला होता. मग नव्याने दोन वर्षांपूर्वी तब्बल ८ कोटी रुपये खर्च करून बनवलेला सिंथेटिक ट्रॅक फक्त दोन वर्षांतच दोनदा खराब झाला, ही बाब गंभीर असून याची चौकशी होणे आवश्यक आहे.

# पाबळ गटात वादळापूर्वीची शांतता; अनपेक्षित उमेदवारामुळे दिग्गजांत संभ्रम

## जिल्हा परिषद गटात प्रमुख पक्षांच्या उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. सध्या वेट अँड वॉचचे धोरण सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा परिषद निवडणुकांचे बिगुल वाजण्याआधीच मतदारांना तीर्थयात्रा घडवून आणण्यात यशस्वी झालेल्या उमेदवारामुळे पाबळ- केंदूर जिल्हा परिषद गटात प्रमुख पक्षांच्या उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. सध्या वेट अँड वॉचचे धोरण सुरू असून कार्यकर्तेही संभ्रमात आले आहेत.

निवडणूक आचारसंहिता लागण्यास मोजके दिवस उरले असतानाही चर्चेत आलेले राष्ट्रवादी भाजप, शिवसेनेचे जिल्हा परिषदेचे दिग्गज उमेदवार अजूनही मतदारसंघात फिरण्यासाठी सक्रिय होत नसल्याने तसेच राष्ट्रवादी व शिवसेना या पक्षातील फुटीमुळे तब्बल पाच पक्षांत विभागले गेले आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांमुळे उमेदवारांमध्येही संभ्रम निर्माण झाल्याची चर्चा सुरू झाली आहे.



### पंचायत समितीचा उमेदवार महत्त्वाचा

**» राष्ट्रवादी अजित पवार गटात जिल्हा परिषद गटाच्या उमेदवारीबाबत पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांचाही शब्द अखेरचा असल्याने पाबळ गटातील उमेदवारी स्ट्राँग उमेदवाराला मिळण्याची दाट शक्यता आहे. पंचायत समितीच्या उमेदवारांची जोडणीही तितकीच महत्वाची ठरणार आहे, याबाबत पंचायत समिती अध्यक्षपद आणि जिल्हा परिषद अध्यक्षपद मिळवण्याची संधी एकाचवेळी पाबळ गटासाठी निर्माण झाली आहे. या गटातून निवडून गेलेल्या उत्तम कामगिरी झालेल्या एका माजी सदस्यांवर मोठी जबाबदारी येणार असल्याची चर्चा आहे.**

नेहमीच राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला राहिलेल्या या गटात यावेळी पक्षफुटीमुळे मतदार विभागले गेले तसे कार्यकर्ते आणि उमेदवारही विभागले गेले आहेत. पाबळ गटाच्या सीमेवरील एका उमेदवाराने आपली प्रचार मोहीम राबवताना सर्वच पक्ष, नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना आपलीच निवड योग्य ठरावी, अशा पद्धतीने यंत्रणा राबवली आहे. त्याचवेळी उमेदवारी जाहीर करताना विलंब होत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उदासीनता आली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

मात्र, राजकीय डावपेचात माहीर असलेल्या पक्षांनाही किमान निवडणूक पूर्व पक्ष प्रचार करण्यासाठी संभाव्य उमेदवारांना मतदारसंघात सक्रिय करता येत नसल्याची बाब पुढे येत आहे. दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणुकीत पक्षाची भूमिका महत्वाची ठरत असली तरी यावेळी मात्र पक्षांमधील फूट निकष बदलवणारी ठरली असल्याने स्ट्राँग उमेदवार हाच निकष पुढे येत आहे. अशा परिस्थितीत स्ट्राँग उमेदवारानीच चुप्पी साधली असल्याने युद्धपूर्व शांतता भासत आहे.

सद्य स्थितीत पक्षांची अगतिकता दिसून येत असल्याने जनतेत अथवा मतदारांपर्यंत आगेकूच करणाराला उमेदवारी, असा निकष ऐनवेळी पुढे केला गेल्यास प्रचाराचा धडाका लावून मतदारांपर्यंत पोहोचणारा तसेच कार्यकर्त्यांची फौज असलेल्या उमेदवारास जिल्हा परिषदेत सदस्यांची संख्या वाढवण्यासाठी प्रमुख पक्षाकडून आमंत्रण मिळण्याची दाट शक्यता आहे.

### पाबळ- केंदूर गट चर्चेत

**» दरम्यान शिरूर आंबेगाव मतदारसंघात जोडण्यात आलेल्या 39 गावांतील तीन जिल्हा परिषद गटांपैकी टाकळी हाजी गटात दोन्ही राष्ट्रवादी पक्षात आणि रांजणगाव गटात राष्ट्रवादी अजित पवार गट व भाजपमध्ये लढती निश्चित झाल्या आहेत, अशा परिस्थितीत पाबळसह तिन्ही गटातील उमेदवार विजयी करण्यासाठी होणारी लढत महत्वाची ठरणार असल्याचे चित्र राष्ट्रवादी अजित पवार पक्षाच्या भवितव्याच्या दृष्टीने महत्वाचे ठरणार आहे.**

### प्रमुख पक्षाकडून आमंत्रण

**» सद्य स्थितीत पक्षांची अगतिकता दिसून येत असल्याने जनतेत अथवा मतदारांपर्यंत आगेकूच करणाराला उमेदवारी, असा निकष ऐनवेळी पुढे केला गेल्यास प्रचाराचा धडाका लावून मतदारांपर्यंत पोहोचणारा तसेच कार्यकर्त्यांची फौज असलेल्या उमेदवारास जिल्हा परिषदेत सदस्यांची संख्या वाढवण्यासाठी प्रमुख पक्षाकडून आमंत्रण मिळण्याची दाट शक्यता आहे.**

# बिबट्या-मानव संघर्षाच्या पार्श्वभूमीवर साखर कारखान्यांसाठी नियमावली

## ऊसतोडणीवेळी काय काळजी घ्यावी तसेच कारखान्यांनी कोणत्या सुविधा उपलब्ध करून द्याव्या, याची नियमावली साखर आयुक्तालयाने तयार केली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

ऊस पीक क्षेत्रात सध्या मोठ्या प्रमाणात बिबट्याचा अधिवास वाढल्याने मानव आणि बिबट्या संघर्ष होत आहे. या पार्श्वभूमीवर ऊसतोडणीवेळी काय काळजी घ्यावी तसेच कारखान्यांनी कोणत्या सुविधा उपलब्ध करून द्याव्या, याची नियमावली साखर आयुक्तालयाने तयार केली आहे. ऊस गाळप हंगाम सुरू झाल्यामुळे ऊसतोडणीही सुरू झाली आहे. त्यामुळे शेतकरी आणि ऊसतोडणी कामगार यांच्या सुरक्षेसाठी साखर आयुक्तालयाने ही सूचना राज्यातील सर्व साखर कारखान्यांना केली आहे.



पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, नगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, धाराशिव आणि लातूर या जिल्ह्यांमध्ये ऊसशेती वाढल्याने एक-दोन जिल्ह्यांपुरते मर्यादित असलेले बिबट्याचे अधिवास क्षेत्रही वाढले आहे. लपण्यासाठी पुरेशी जागा, ससे, रानडुक्कर अशी मुबलक शिकार आणि पाणी उपलब्ध असल्याने नैसर्गिक क्षेत्र नसूनही सर्वदूर बिबट्याचा संचार वाढू लागला आहे.

ऊस कारखान्याच्या परिसरात तसेच ऊसतोडणीच्या ठिकाणी झोपड्या उभारून कामगार वास्तव्य करतात. ऊस तोडणीवेळी बिबट्याची पिल्ले सापडतात तसेच कामगारांवर बिबट्याचे हल्ले होण्याच्या घटनाही वाढत आहेत. ऊसतोड मजूर पती-पत्नींच्या लहान मुलांवरील हल्लेही वाढले आहेत. यासंदर्भात शेतामध्ये एकट्याने जाणे टाळावे. समूहाने काम करावे. लहान मुले आणि ज्येष्ठांना घराच्या बाहेर किंवा शेतात एकटे सोडू नये. घराबाहेर किंवा शेतामध्ये रात्री झोपण्यात येऊ नये. ऊसतोड कामगारांच्या वास्तव्याच्या ठिकाणी सौरऊर्जा कुंपण करावे. दिवस उगविण्यापूर्वी किंवा मावळल्यानंतर शेतात जाणे टाळावे, अशी नियमावली कारखान्यांनी करावे, असे साखर आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे.

> **बिबट्याचा धोका टाळण्यासाठी ऊसतोडणी कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांनी समूहाने काम करावे. बिबट्याचा अधिवास असलेल्या भागातील ऊसक्षेत्रात वनविभागाने जनजागृती आणि आवश्यक उपाययोजना करण्याची सूचना दिली आहे**
>
> **- डॉ. संजय कोलते, साखर आयुक्त**

'साखर कारखान्यांनी वनविभागाच्या मदतीने ऊसतोडणी कामगारांना बिबट्याच्या अधिवासाची माहिती द्यावी, कामगारांची राहण्याची व्यवस्था शेतीऐवजी दुसऱ्या ठिकाणी करावी, कामगार शेतात राहणार असतील तर झोपड्यांना संरक्षण द्यावे, मजुराच्या वास्तव्याच्या ठिकाणी विजेची सोय असावी, पती-पत्नी कामगार उसतोडणी करीत असताना त्यांच्या मुलांच्या संगोपनाची तसेच शिक्षणाची व्यवस्था करावी, बिबट्याबद्दल शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी, अशा सूचनाही कारखान्यांना करण्यात आल्या आहेत.